# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.11.2024** **वारःसोमवार**

---

1. झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचारासाठी केवळ एक दिवस शिल्लक असताना राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांचा मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न, महाराष्ट्रातही निवडणूक प्रचाराला जोर.
2. जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत एका जवानाला वीरमरण आणि तीन जखमी.
3. रशिया आणि युक्रेनचे परस्परांवर विक्रमी संख्येने ड्रोन हल्ले.
4. दुसऱ्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून भारताचा पराभव आणि
5. महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद चषक स्पर्धेला आजपासून बिहारमधील राजगीर इथं सुरुवात

<u>**निवडणूक-प्रचार**</u>

झारखंडमध्ये, राज्य विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचारासाठी केवळ एक दिवस शिल्लक असताना विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते त्यांच्या उमेदवारांना पाठिंबा मिळवण्यासाठी शेवटचे प्रयत्न करत आहेत.

पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल गुमला आणि बोकारो इथं जाहीर सभांना संबोधित केले. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार 'सबका साथ, सबका विकास' या मंत्राशी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. मोदी यांनी झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसवर टीका करताना सांगितलं की त्यांचे हेतू राज्याच्या प्रगतीशी जुळत नाहीत. पंतप्रधानांनी राज्यातील शेतीला चालना देण्याच्या उद्देशानं नाचणीसारख्या धान्याचं उत्पादन आणि विक्री वाढवण्याच्या योजना देखील जाहीर केल्या. मोदींनी काल संध्याकाळी रांचीमध्ये भव्य पदफेरी काढली.

झामुमोचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी रांची इथं निवडणूक सभा घेतली. सोरेन यांनी भाजपवर केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोप केला. त्यांना विरोध करणारे आवाज भाजप दाबत असल्याची टीकाही त्यांनी केली. दरम्यान, कोडरमा इथं प्रचार सभेत RJD प्रमुख लालू प्रसाद यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप केला. झारखंडच्या निरंतर विकासासाठी त्यांनी मतदारांना I.N.D.I.A. ब्लॉकला पाठिंबा देण्याचं आवाहन केलं.

पलामू इथल्या एका जाहीर सभेत लोक जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष चिराग पासवान यांनी हेमंत सोरेन यांच्यावर मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात खोटी आश्वासनं दिल्याचा आरोप केला. पासवान यांनी दावा केला की झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते सोरेन बांगलादेशी घुसखोरांना मतदार म्हणून सुरक्षित करण्यासाठी संरक्षण देत आहे, परिणामी राजकीय तणाव आणखी वाढत आहे.

काँग्रेस, एजेएसयू आणि डाव्या पक्षांचे नेतेही राज्यभर सक्रियपणे प्रचार करत आहेत. बुधवारी राज्यात पहिल्या टप्प्यात 43 विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात या महिन्याच्या 20 तारखेला 38 जागांसाठी मतदान होणार आहे.

**प्रचार-महाराष्ट्र**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते मुख्य मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि मतदारांचा पाठिंबा मिळवण्याकरिता राज्यभरात मेळावे, पथ फेरी आणि जाहीर सभा घेत आहेत. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी काल जळगाव, मलकापूर आणि बुलढाणा इथं सभांना संबोधित केलं. विरोधी महाविकास आघाडी खोटी आश्वासनं देत असल्याचा आरोप त्यांनी केला.

शाह यांनी कालच मुंबईत भाजपचा जाहीरनामा प्रकाशित केला. काँग्रेस अध्यक्ष मलिकार्जुन खर्गे यांनीही काल महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रकाशित केला. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी नागपूर आणि यवतमाळमध्ये सभा घेतल्या.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी धाराशिव, अहमदनगर आणि छत्रपती संभाजी नगर इथं आघाडीच्या उमेदवारांच्या बाजूनं प्रचार केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची सोलापुरात जाहीर सभा झाली. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना पक्षाचे नेते आदित्य ठाकरे म्हणाले की, महागाई आणि बेरोजगारी या महाराष्ट्रातील प्रमुख समस्या आहेत.

**स्वच्छता**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यालयांची संपूर्ण स्वच्छता, जागा व्यवस्थापन, शाश्वत पद्धतींना चालना आणि प्रलंबित प्रकरणांचा अपेक्षित निपटारा यावर केंद्रित विशेष मोहीमेच्या चौथ्या टप्प्याची प्रशंसा केली आहे. या टप्प्यामध्ये 2021 पासून केवळ भंगाराची विल्हेवाट लावून सरकारच्या तिजोरीत 2 हजार 364 कोटी रुपयें जमा झाले. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी समाज माध्यमावर दिलेल्या संदेशाला उत्तर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, या मोहिमेच्या यशातून सामूहिक प्रयत्नांनी काय साध्य होऊ शकतं ते दिसून येतं. स्वच्छता आणि आर्थिक विवेकबुद्धी यांना प्रोत्साहन देऊन शाश्वत परिणाम साध्य करता येतात. कार्यक्षम व्यवस्थापन आणि सक्रिय कृतीवर लक्ष केंद्रित केल्यामुळं या प्रयत्नांना चांगलं यश मिळालं आहे, असंही ते म्हणाले.

**जम्मू काश्मीर-चकमक**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, किश्तवाड जिल्ह्यातील दुर्गम जंगल भागात दहशतवाद्यांशी काल झालेल्या चकमकीत लष्कराच्या विशेष दलाचा कनिष्ठ अधिकाऱ्यानं प्राणांची आहुती दिली. तर या चकमकीत तीन जवानही गंभीर जखमी झाले. दोन ग्राम संरक्षण रक्षकांची हत्या झाल्यानंतर गुप्तचर माहितीच्या आधारे किश्तवाडमधील भरत रिजच्या भागात सुरक्षा दलांनी संयुक्त कारवाई सुरू केली. या परिसरात तीन ते चार दहशतवादी असल्याची शक्यता वर्तवली जात असून मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू आहे. अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे. दरम्यान, काल संध्याकाळी श्रीनगर जिल्ह्यातील झाबरवान जंगल परिसरात आणखी एक संयुक्त दहशतवादविरोधी मोहीम संपली. तर बारामुल्ला जिल्ह्यातील राजपुरा सोपोर भागात काल झालेल्या कारवाईत एक अज्ञात दहशतवादी मारला गेला, असं लष्कराच्या प्रवक्त्यानं सांगितलं.

**<u>रशिया-युक्रेन</u>**

रशिया आणि युक्रेननं काल एका रात्रीत परस्परांवर विक्रमी संख्येने ड्रोन हल्ले केले. रशियानं काल रात्री एकंदर 145 ड्रोन हल्ले केले, तर युक्रेननं देखील मॉस्कोच्या दिशेनं 34 ड्रोन हल्ले केले. 2022 मध्ये युद्ध सुरू झाल्यापासून रशियाच्या राजधानीवर झालेला हा सर्वात मोठा ड्रोन हल्ला आहे, यामुळे शहरातील तीन प्रमुख विमानतळांवरून उड्डाणे वळवण्यात आली आणि एक व्यक्ती जखमी झाली. मात्र मोठं नुकसान झालेलं नाही. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी उत्तर कोरियासोबत परस्पर संरक्षण तरतूद समाविष्ट असलेल्या देशाच्या धोरणात्मक भागीदारीबाबतच्या करारावर स्वाक्षरी केल्यानंतर हा ड्रोन हल्ला झाला.

**<u>ट्रंप</u>**

अमेरिकेत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी ॲरिझोना राज्य जिंकलं आहे, 11 इलेक्टोरल मते असलेले ॲरिझोना हे निकाल जाहीर करण्यासाठीचं शेवटचं राज्य होतं. 5 नोव्हेंबरला झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत ट्रम्प यांनी जिंकलेली पेनसिल्व्हेनिया, विस्कॉन्सिन, मिशिगन, नॉर्थ कॅरोलिना, नेवाडा आणि जॉर्जिया ही अन्य सहा राज्ये आहेत.

**<u>दिल्लीची-हवा</u>**

दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता अजूनही अत्यंत निकृष्ट या श्रेणीत आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानुसार, दिल्लीत काल रात्री 8 वाजता हवेचा गुणवत्ता निर्देशांक, 336 AQI इतका नोंदवला गेला. येत्या दोन ते तीन दिवसांत दिल्ली एनसीआरमध्ये रात्री आणि सकाळच्या वेळी धुकं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक हा 0 ते 50 दरम्यान चांगला, 51 ते 100 दरम्यान समाधानकारक, आणि 101 ते 200 दरम्यान मध्यम मानला जातो.

**<u>क्रिकेट</u>**

दक्षिण आफ्रिकेनं काल गकेबरहा इथल्या सेंट जॉर्ज पार्क मैदानावर झालेल्या क्रिकेट सामन्यात भारताचा तीन गडी राखून पराभव केला. भारतानं  केलेल्या 125 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेनं 19 षटकांतच 7 गडी गमावून 128 धावा पूर्ण केल्या. ट्रिस्टन स्टब्सनं 47 धावांवर नाबाद राहत लक्षणीय खेळी खेळली. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं. तर जेराल्ड कोएत्झीने 9 चेंडूत 19 धावा केल्या. भारतातर्फे वरुण चक्रवर्तीनं 5 बळी घेतले. तत्पूर्वी, भारतानं निर्धारित 20 षटकांत 6 बाद 124 धावा केल्या. हार्दिक पंड्यानं सर्वाधिक 39 धावा केल्या. अक्षर पटेलनं 27 धावा आणि तिलक वर्मानं 20 धावांचं योगदान दिलं. या सामन्यातील दक्षिण आफ्रिकेच्या विजयामुळे चार सामन्यांच्या मालिकेत आता 1-1 अशी बरोबरी झाली आहे. तिसरा सामना येत्या बुधवारी 13 नोव्हेंबरला सेंच्युरियनमध्ये होणार आहे.

**<u>महिला-हॉकी</u>**

महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद चषक 2024 स्पर्धेला आजपासून बिहारमधील नालंदा इथल्या राजगीर इथं सुरुवात होत आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते या क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन होईल. या स्पर्धा दहा दिवस चालणार आहेत, असं बिहार क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक रवींद्रन शंकरन यांनी आकाशवाणी बोलताना सांगितलं.

# याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.